शासकीय तंत्रनिकेतन, मिरज
माजी सैनिक वसाहती जवळ, एम.आय.डी.सी.एरिया, विद्यानगर, मिरज-४१६ ४१०.
दुरध्वनी क्रमांक - कार्यालय (०२३३) २२३१४२३ कार्यालय (०२३३) २२३१२६१
Email : gpmiraj@gmail.com Website : www.gpmiraj.ac.in

जा.क्र.शातंनिमि/आस्था-३/कोविड-१९/२०२१/938

दिनांक : 15 MAY 2021

**परिपत्रक**

विषय : ब्रेक द चेन अभियानासंदर्भात शासनाच्या सुधारीत मार्गदर्शक सूचना दि.१३ मे, २०२१

संदर्भ :
१. महाराष्ट्र शासन, महसूल व वने विभाग , आपत्ती व्यवस्थापन कक्ष, मंत्रालय मुंबई यांचे आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१/ Dated १३ मे, २०२१
२. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र. तंशिविकापु/आस्था ३ब/२०२१/२१७० दि.१४.०५.२०२१
३. महाराष्ट्र शासन, महसूल व वने विभाग , आपत्ती व्यवस्थापन कक्ष, मंत्रालय मुंबई यांचे आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१/ Dated २९ April, २०२१
४. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.शातंनिमि/आस्था/कोविड-१९/२०२१/८३२ दि.०५.०४.२०२१
५. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.शातंनिमि/आस्था/कोविड-१९/२०२१/८५८ दि.१५.०४.२०२१
६. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.शातंनिमि/आस्था/कोविड-१९/२०२१/८३२ दि.२२.०४.२०२१
७. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.शातंनिमि/आस्था/कोविड-१९/२०२१/९१४ दि.३०.०४.२०२१

उपरोक्त संदर्भांकीत विषयास अनुसरुन, संस्थेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, कोवीड - १९ साथरोगाच्य पार्श्वभूमीवर लागू केलेले निर्बंध शिथिल करणे व टाळेबंदी टप्याटप्याने उठविणे (ब्रेक द चेन ) या संबंधी वेळोवेळी शासन आदेश निर्गमित करणेत आलेले असून, संदर्भ क्र. ०३ चे आदेशातील तरतूदी दि. ०१ मे, २०२१ पासून दि.१५ मे, २०२१ (सकाळी ०७.०० वाजेपर्यंत) य कालावधीकरीता लागू करणेत आलेल्या होत्या.

तथापि, संदर्भ क्र. ०१ अन्वये कोवीड - १९ साथरोगाच्या पार्श्वभूमीवर लागू केलेले निर्बंध शिथिल करणे व टाळेबंदी टप्याटप्याने उठविणे (ब्रेक द चेन ) या संबंधी संदर्भ क्र.०१ अन्वये सुधारीत आदेश निर्गमित करणेत आलेले असून, कार्यालयीन उपस्थिती व वर्क फ्रॉम होम बाबतच्या तरतूरी संदर्भ क्र. ०३ चे आदेशात नमूद केलेनुसारच असल्याचे नमूद केलेले आहे. तसेच सदरहू सुधारीत आदेश हे **दि.०१ जून, २०२१ (सकाळी ०७.०० वाजेपर्यंत) या कालावधीकरीता लागू राहतील.**

त्या अनुषंगाने संदर्भीत आदेशानुसार कार्यवाही करुन संस्थेत / विभागात कोविड - १९ साथरोगाचा प्रसार रोखण्याच्या दृष्टीने सोशल डिस्टंसिंग, मास्क परिधान करणे इ. बाबींचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे. संस्थेतील प्रत्येक विभागाचे हजेरीपत्रक हे विभागप्रमुखांच्या अखत्यारीत असलेने, **विभाग प्रमुख यांनी त्यांचे अधिनस्त सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे संदर्भीय शासन आदेशामध्ये नमूद केलेनुसार कार्यालयीन उपस्थिती बाबत योग्य ते नियोजन करुन तसे आदेश विभाग प्रमुख स्तरावरुन निर्गमित करावेत.**

तसेच जे अधिकारी / कर्मचारी उपरोक्त संदर्भाच्या अनुषंगाने Work From Home करतील त्यांनी प्रत्येक दिवशी केलेल्या कामाच सविस्तर अहवाल ठेवावा. अहवालात मोघमपणे Work From Home असे नमूद करु नये. ब्रेक द चेन अभियानांतर्गत Work From Home बाबतचा अहवाल संबंधीत विभाग प्रमुख यांनी एकत्रितरीत्या दि.17.05.2021 रोजी कार्यालयास सादर करणेबबात संदर्भ क्र.0 च्य परिपत्रकान्वये कळविले होते, तथापि **विभाग प्रमुख यांनी संदर्भ क्र. 04 ते 07 चे अनुषंगाने (दि.01 एप्रिल, 2021 ते दि.31.05.2021 या कालावधीतील) Work From Home बाबतचा विभागाचा अहवाल (मोघमपणे वर्क फ्रॉम होम असा देवू नये) दि.02.06.2021 रोजी कार्यालयास सादर करावा.**

तसेच संस्थेस कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांची आवश्यकता भासल्यास त्यांनी तात्काळ कर्तव्यावर हजर राहणे गरजेचे आहे त्यासाठी त्यांनी कार्यालयास दिलेला भ्रमणध्वनी क्रमांक चालू टेवावेत व आपले ईमेल आयडी वेळोवेळी तपासणे गरजेचे आहे.

(कॅप्टन नि. पां. सोनजे )
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, मिरज.

प्रत :- सर्व विभाग प्रमुख / प्रभारी अधिकारी (सर्व), शासकीय तंत्रनिकेतन, मिरज यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
2/- त्यांना असेही कळविण्यात येते की, सदरहू परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व कर्मचारी / अधिकारी यांचे निदर्शनास आणुन दयावे. तसेच सर्व संबंधीतांना वरील सर्व बाबींबाबत आपले स्तरावरुन अवगत करावे.
श्री. एल. पी. काळे. प्रोग्रामर यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी

Scanned with CamScanner